## नि.क.३६ खालील आदेश

वादी हिने सदरचा अर्ज हा तिच्या वादपत्रामधील प्रतिवादी कं.१ चे नाव कमी करण्याकरीता सादर केला आहे. वादी हिच्या तर्फे ॲड.श्री.मंदाडे यांनी असा युक्तिवाद केला की, वादी हिला प्रतिवादी कं.१ हे आवश्यक पक्षकार आहेत असे वाटले व त्यामुळे तिने प्रतिवादी कं.१ ला सदरच्या दाव्यात शामील केले. परंतु, वादी हिला प्रतिवादी कं.१ विरूध्द आता कोणतीही दाद मागायची नाही. पुढे त्यांनी असा युक्तिवाद केला की, वरील कारणामुळे वादपत्रावरून प्रतिवादी कं.१ चे नाव कमी करण्यात यावे. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२) प्रतिवादी कं.४ तर्फे श्री.पाटील सरकारी वकिलांनी यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी कं.१ चे नाव कमी केल्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

३) प्रतिवादी कं.५ तर्फे श्री.ए.एस.पाटील वकिलांनी यांनी असा युक्तिवाद केला की, वादी हिने सादर केलेला अर्ज हा संयुक्तिक नसुन खारीज होण्यास पात्र आहे.

४) वादी हिने प्रतिवादी कं.१ च्या विरूध्द कोणतीही दाद तिला मागायची नाही असे कथन केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी कं.१ चे नाव वादपत्रावरून कमी केल्यास वादपत्राच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. प्रतिवादी कं.१ चे नाव वादपत्रावरून कमी केल्यास इतर प्रतिवादींचे सुध्दा कोणतेही नुकसान होत नाही. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादी हिने प्रतिवादी कं.१ चे नाव कमी करणेबाबतची दुरुस्ती ही दि.०३/१०/२०१९ रोजी करावी.

अहमदपुर.
दिनांक : २५.०९.२०१९.

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
अहमदपूर.

Certified that PDF copy of Order supra is word-to-word identical to the original Order.

Name of Stenographer : A.S.Kodgire
Dictated on : 25.09.2019
Checked on : 25.09.2019
Signed on : 25.09.2019
Uploaded on : 25.09.2019